स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या ‘मानव्यविद्या’शाखेअंतर्गत मराठी विषयातील पीएच.डी. (विद्यावाचस्पती) पदवीसाठी सादर करण्यात येणा-या शोधप्रबंधाचा स्थूल आराखडा

शीर्षक

व्यावसायिक रंगभूमीवरील मराठी नाटकांची गुणवत्ता आणि लोकप्रियता (२०००ते २०१५या कालखंडाच्या संदर्भात)

संशोधक

नवनाथ विश्वनाथ पाटोळे

(एम.ए, बी.एड, नेट, एम.फिल.)

मार्गदर्शक

प्रा.डॉ. गंगाधर शिवाजी नामगवळी

(सहयोगी प्राध्यापक, महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालय, उदगीर)

संशोधन केंद्र

मराठी विभाग,

महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालय, उदगीर,जि. लातूर.

जून,२०१७

व्यावसायिक रंगभूमीवरील मराठी नाटकांची गुणवत्ता आणि लोकप्रियता

(२०००ते २०१५या कालखंडाच्या संदर्भात)

प्रास्ताविक:-

मराठी नाटक,मराठी रंगभूमी आणि मराठी माणूस यांचा दीर्घकाळापासूनचासंबंध आलेला आहे.ह्या संकल्पनांशी काळ आणि संस्कृती यांचे एकजीव नाते आहे. नाटक हा मानवाच्या मन:पटलावर दृश्य स्वरूपात अनुभव देणारा वाङ्मय प्रकार आहे. त्यामुळे मानवी मनावर तो परिणामकारक ठरतो. प्राचीन नाटकापेक्षा आजचे नाटक खूप बदललेले आहे.त्याला व्यावसायिक रूप मिळाल्याचे दिसून येते.

पुराणकथेपासून मराठी नाटकाला वाङ्मयीन ओळख आहे. मराठी नाटककारांनी पौराणिक नाट्यनिर्मिती करतानापुराणकथांना सामोरे ठेवले वत्यातूनध्वनित होणाऱ्या पारंपरिक अर्थात नाट्यहेतूनुरूप बदल केले आणि त्या अर्थाला काळानुरूप नवे संदर्भ प्राप्त करून दिले. यातून प्रायोगिक रंगभूमी, हौशी रंगभूमी, व्यावसायिक रंगभूमी तयार झाल्या. मराठी नाटकाच्या रूपाने व्यावसायिक रंगभूमीवरील मराठी नाटकांची गुणवत्ता आणि लोकाभिरूची (२०००ते२०१५ या कालखंडाच्या संदर्भात) या संशोधन विषयाचा अभ्यास करण्यात येणार आहे.

विषयाची निवड :-

सध्या नाटक हा विषय संशोधनाच्या दृष्टिने दुर्लक्षित आहे.प्रायोगिक रंगभूमीचे रूपांतर व्यावसायिक रंगभूमीत झाले.नाटकाला व्यवसायाचे रूप मिळू लागले.जुनी नाटके नव्याने रंगमंचावर येऊ लागली. एकच प्याला, रायगडाला जेव्हा जाग येते, घाशीराम कोतवाल, शांतता कोर्ट चालू आहे यांसारख्या नाटकांनी मिळविलेल्या व्यावसायिक यशाबरोबरच त्यांची वाङ्मयीन गुणवत्ता आणि लोकप्रियतामहत्वाची आहे. व्यावसायिक रंगभुमीवर येणारे नाटक वाङ्मयीन गुणवत्ता असलेले असेलच असे नाही.प्रेक्षकांना काय आवडते त्यांची रुची कशात आहे याचा विचार व्यावसायिक रंगभूमीवर प्रामुख्याने केला जातो.जी नाटके गल्लाभरु ठरतील, पैसे मिळवून देऊ शकतील असे व्यापारी दृष्टीकोन नजर समोर ठेवून नाटकाची निवड केली जाते आणि त्याच भूमिकेतून ती रंगभूमीत सादर देखील होतात.व्यावसायिक रंगभूमीवरुन सादर

होणाऱ्या नाटकांची वाङ्मयीन गुणवत्ता तपासणे या दृष्टीने महत्वाचे ठरते. नाटकांची निवड करतांना लोकप्रियता कशी विचारात घेतली गेली आणि नाटकात त्यांचे कोणते विशेष आढळले याचा विचार होणे महत्त्वाचे आहे.

विषयाचे महत्त्व :-

मराठीत नाटक नाटककार यांचा वेगवेगळ्या अंगाने अभ्यास झाल्याचे दिसून येते. इतर वाङमय प्रकारापेक्षा नाटकाची वेगळी ओळख आहे. प्रायोगिक नाटके, पौराणिक नाटके, ऐतिहासिक नाटके, समस्याप्रधान नाटके, सामाजिक नाटके, यांसारख्या नाटकांतूनच व्यावसायिक रंगभूमी तयार झाली.

व्यावसायिक नाटकाचे यश हे आर्थिकदृष्ट्या नाटक किती यशस्वी झाले यावर अवलंबून असते.परंतु अशा नाटकांची वाङमयीनगुणवत्ता व लोकांमध्येनिर्माण झालेली अभिरूची तपासून तिचे स्वरूप मांडणे अगत्याचे आहे.

विषयाची व्याप्ती :-

व्यावसायिक रंगभूमीवरील नाटकांच्या गुणवत्तेचा व लोकाभिरूचीचा अभ्यास करताना २०००ते २०१५ या कालखंडात रंगमंचावर सादरीकरण झालेल्या नाटकांचा प्रभाव व परिणाम रसिकांवर पडलेला दिसून येतो ते तपासणे. त्यासाठी व्यावसायिक नाटकांतून सामाजिक, राजकीय, ऐतिहासिक, विनोदी नाटकांमधून प्राथमिक साधने गोळा करून त्या नाटकांच्या वाङ्मयीन गुणवत्तेची व लोकप्रियतेची सांगड घालणे व स्वरूप निश्चित करणे असे या अभ्यासाचे धोरण आहे.प्रस्तुत विषयामध्ये २००० ते २०१५ या कालखंडातील रंगभूमीवर सादर झालेल्या व्यावसायिक नाटकांचाच अभ्यास केला जाणार आहे.

अभ्यासाची उद्दिष्ट्ये :-

१) व्यावसायिक नाट्यवाङ्मयीन प्रकाराची वैशिष्ट्ये आणि त्याचे दृक - श्राव्य स्वरूप तपासणे.
२) व्यावसायिक नाटकांचे विविध तांत्रिक घटक आणि त्यांचे महत्त्व यांचा अभ्यास करणे.
३) व्यावसायिक रंगभूमीवरून सादर होणाऱ्या नाटकांचे विशेष तपासणे.
४) व्यावसायिक नाटकांची संहिता आणि संहितेचे सादरीकरण यातील स्थित्यरांचा अभ्यास करणे.

५) २००० नंतरच्या व्यावसायिक रंगभूमीवरील नाटकांच्या यशाचा अभ्यास करणे.

अभ्यासपध्दती :-

व्यावसायिक रंगभूमीवरील नाटकांची गुणवत्ता व लोकाभिरूचीया दृष्टिकोनातून अभ्यास करताना वाङमयीन मूल्यमापन करण्यात येईल. त्याचप्रमाणे लोकांमध्ये निर्माण झालेल्या अभिरूचीचाही अभ्यास करण्यात येईल.नाटक हा वाङ्मय प्रकारअसला तरी तो एक कला प्रकारहीआहे याची जाणीव ठेऊनअभ्यास करता येईल. रा. ग. गडकरी, वसंत कानेटकर , प्र. के. अत्रे,श्री. कृ. कोल्हटकर, वि. भा. देशपांडे, कल्पना कामत यांसारख्या विद्वानांच्या नाट्यसंरचनेचा अभ्यास करता येईल.

संकल्पित प्रबंधाची प्रकरण विभागणी

प्रकरण पहिले - मराठी नाटक संकल्पना व स्वरूप

प्रकरण दुसरे - मराठी व्यावसायिक रंगभूमी

प्रकरण तिसरे - व्यावसायिक रंगभूमीवर सादर होणारी नाटके

प्रकरण चौथे - व्यावसायिक रंगभूमीवरून सादर होणाऱ्या नाटकांचे विशेष

प्रकरण पाचवे - उपसंहार

प्रकरण पहिले

मराठी नाटक संकल्पना व स्वरुप

प्रस्तावना :

नाटक हा एक ललित वाङ्मय प्रकार आहे.ललित वाङ्मयाचा उद्देश म्हणजे जीवनातील काही सत्य कल्पित प्रसंगानी कलात्मक रीतीने समाजापुढे आणणे व मनोरंजन करणे.ललित वाङ्मय म्हणजे ज्या वाङ्मयातून व्यक्तिला आल्हाद म्हणजे आनंद मिळतो.नाटक हे ही त्याला अपवाद नाही.नाटकातून माणसाच्या मनाला आनंद मिळतो. काही नाटकातून माणसाला दु:खाची जाणीवही होते. नाटकाचा अभ्यास करण्यापूर्वी त्याची संकल्पना समजून घ्यावी लागते.

नाटक म्हणजे काय?

प्रयोगरुपाने रंगभूमीवर उभे राहिलेले, नटवर्गाने दृश्यात्मक रुपाने साकार केलेले नाटक. अशी नाटकाविषयी आपली कल्पना असते.परंतु एवढीच कल्पना गृहित धरली तर रंगभूमी आणि नाटक यामध्ये दुजाभाव कल्पिल्या सारखे होते.म्हणून नाटक म्हणजे नेमके काय याचा अभ्यास या मुद्यामध्ये करणार आहे.

नाटकाची व्याख्या

१) सिसिरो : "नाटक हे जीवनाचे अनुकरण आहे. चाली रीतींचा आरसा आहे. सत्याचे प्रतिबिंब आहे. "

२) प्रा.वा.ल. कुलकर्णी:“ नाटक हा जीवनाच्या विविधांगी द्वंद्वात्मक जाणिवेचा एक विशेष अविष्कार आहे.” अशा प्राचीन व आधुनिक व्याख्यांद्वारे नाटकाच्या नेमक्या व्याख्येचा शोध अभ्यासाअंती घेता येणार आहे.

नाटकाचे स्वरुप :-विष्णूदास भावे यांनी १८४३ मध्ये 'सीता स्वयंवर' पासून मराठी नाटकाचा आणि संगीताचा संबंध जोडला.यालाच आपण संगीत नाटक म्हणतो.या कालखंडात नाटकात संगीताला प्राधान्य

होते.नंतरच्या काळात नाटकाचे स्वरुप बदलल्याचे दिसून येते.नटसम्राट नाटकाच्या प्रस्तावनेत वि.वा.शिरवाडकर म्हणतात, 'मराठी रंगभूमीवरील एका नटश्रेष्ठासाठी' 'किंग लियर' चे रुपांतर करावे अशी योजना माझ्याकडे आली होती.त्याबाबत विचार करतांना सम्राटाऐवजी एक वयोवृध्द नटसम्राट माझ्या मनात उभा राहिला आणि त्यानेच कल्पनेचा कब्जा घेतला.ते चित्र प्रेक्षकांना सादर करीत आहे.'पूर्वीचे संगीतमय, पौराणिक असलेले नाटक प्रेक्षकांच्या आवडी-निवडीनुसार लिहिले जाऊ लागले.या नाटकाच्या बदलत्या स्वरुपाचा अभ्यास या मुद्यात करता येणार आहे.त्याचप्रमाणे नाटकाचे घटक व वैशिष्ट्ये यांचाही अभ्यास वरील प्रमाणे करता येईल.

नाटकाचे घटक :

इ.स.१८४३ मधील संगीत स्वयंवर ते आजपर्यंत सादर होत असलेल्या नाटकाचे घटक पुढीलप्रमाणे दिसून येतात.

संहितानिष्ठ घटक :-

संहितानिष्ठ घटकाचे विषयसूत्र, संविधानक पात्रांचे चित्रण, संवाद हे घटक मानले जातात.विषय सुत्राचा अभ्यास केल्यास यात नाटयानिर्मिती आणि नाटकाचा आस्वाद या दोन्ही गोष्टी सामुहिक पातळीवर असतात.उदा.संगीत सौभद्र. या नाटकातील विषयसूत्र पुढीलप्रमाणे आहे.

अर्जूनाचा संन्यास घ्यायचा निर्णय झाला आहे.या पार्श्वभूमीवर दुसऱ्या अंकाच्या आरंभाला श्रीकृष्णाचे स्वगत येते.

श्रीकृष्ण : काय सांगावे ! दादांचा स्वभाव हट्टी नसता तर त्यांच्या सारखा पुरुष अद्याप झाला नाही, असे म्हणावयास काही हरकत नव्हती, आणि त्यांच्याशी प्रतारणा करण्याचेही मला कारण पडले नसते.श्रीकृष्णाचे हे स्वगत म्हणजे नाटकाला गती देणारे आहे.म्हणून हे स्वगत म्हणजेच नाटकाचे विषयसुत्र आहे. अशाप्रकारे संविधानक पात्रांचे चित्रण, संवाद यांचा अभ्यास करता येईल. त्याचप्रमाणे सादरीकरणाच्या घटकातील नेपथ्य, वातावरणनिर्मिती संगीत यांचाही अभ्यास करणार आहे

वैशिष्टये :

२१ व्या शतकात नाटकात आमुलाग्र बदल झाला. या आधुनिक युगाप्रामाणेच नाटकाची सर्वसाधारण वेशिष्ट्ये आपणास सांगता येतील. झोपी गेलेला जागा झाला या नाटकाची वैशिष्टये आपणांस पुढील घटनेवरुन सांगता येतील.

रत्ना : काय झाल दिनूसाहेब ?

दिनु : कांही नाही मी या घरांत जिवंत राहू शकत नाही. संध्याकाळच्या आंत माझा मुडदा पडणार येथे. सासूबाई - बापरे! सासूबाई येथे असेपर्यंत मी कुठे तरी गेले पाहिजे.

रत्ना : अं.. . . . . गेलं पाहिजे?

दिनू : ताबडतोब गेलं पाहिजे. कुठेतरी . . . . . सिनेमाला जावू म्हणतो.वरील प्रसंगात उपहास, विडंबन, विसंवाद दिसून येतात.मरणाच्या दारातील माणूस चित्रपटाला जाऊ शकत नाही.म्हणून नाटकाची ही वैशिष्ट्ये आपणांस दिसून येतात.या प्रमाणेच नाटकाचा अभ्यास करतांना आढळणाऱ्या वेशिष्ट्यांचा अभ्यास करणार आहे.

नाटक व एकांकिका साम्य भेदः-

दर्शनी पडदा उघडल्यावर दर्शनी पडदा पडेपर्यंतच्या नाटकाच्या एका भागाला अंक म्हणतात.दोन किंवा अधिक अंकांचे मिळून नाटक होते.पूर्वीच्या नाटकात असे पाच अंक असत.नाटकाचा एक अंक आणि एकांकिका यांचे बाह्यरुप सारखे असते.पण एकांकिकेची रचना नाटकापेक्षा वेगळी असते.म्हणून स्थूलमानाने एक अंक असणाऱ्या नाटय प्रकारास एकांकिका म्हणतात.

नाटक व एकांकिका साम्यभेदाचा अभ्यास घटना, प्रेक्षकांचे मनोरंजन, अनुवाद, यशस्वीता, कथानक, विषय, पात्र इ.मुद्दयांच्या आधारे करणार आहे.

नाटकाचे प्रकार :

नाटकाचे मुख्य चार प्रकार आहेत.या चारही प्रकारांचा या घटकामध्ये अभ्यास करणार आहे. शोकात्मक नाटक - ज्या नाटकात शोक किंवा दु:ख प्रधान असेल त्याला शोकात्मक नाटक म्हणतात उदा. नटसम्राट.

आप्पा बेलवलकर या शोकनाट्याचा नायक आहे.आपली सगळी संपत्ती मुलांच्या नावावर केल्यानंतर झालेली अवहेलना या नाटकात आहे.या शोकनाटयातील आप्पांचा अहंकार हा पापात्मा आहे.हे आपल्याला पुढील प्रसंगावरुन जाणवते.

अप्पा : माणसं वाईट नसली तरी म्हातारपण वाईट असत . . .

अशा या दुरितातूनच या शोकात्म नायकाच्या दु:खाची सुरुवात होते. अशा प्रकारे सुखात्मक नाटक, प्रहसन, मेलोड्रामा या नाट्यप्रकाराचा सविस्तर अभ्यास करता येईल.

पौराणिक नाटक :

जी नाटके पुराणकथेवर आधरित असतात त्यांना पौराणिक नाटक म्हणतात. उदा.संगीत ययाती या नाटकाचा पूर्वार्ध हा ययातीची पारंपरिक कथा सांगणारा आहे.आणि त्या भागातील देवयानीचे व्यक्तिमत्त्वही पुराणातील देवयानीच्या पारंपरिक व्यक्तिमत्त्वाशी मिळते जुळते आहे.देवयानीला समजूतदार बनवून एका प्रसंगात शर्मिष्ठा व ययाती हे तिची क्षमा मागतात. तेव्हा ययाती म्हणतो,

'समजे तव दासी । तत्पर आहे तव सेवेसी।

सेवक मी तव पदीचा कंटाळा का मग दानाचा।

करितो आता मी विनतीशी टाकूनिया दे तू कोपाशी'।

अशा प्रकारचे प्रसंग हे पुराणकथेतील आहेत.या पुराणकथेचा आधार घेऊन नाटकाची निर्मिती

झाली.नल-दमयंती, कृष्ण रुक्मिणी, माता द्रौपदी, कालयवन व रंगपांचालिक या सारख्या नाटकांची निर्मिती झाली.अशा नाटकांचा अभ्यास या घटकामध्ये करता येईल.

त्याचप्रमाणे ऐतिहासिक, समस्या प्रधान, सामाजिक, राजकीय, दलित,स्त्रीवादी, चर्चाप्रधान या नाटकाच्या उपप्रकारांचा अभ्यास वरील प्रमाणे करता येईल.

प्रकरण दोन

मराठी व्यावसायिक रंगभूमी

नाटक हे मुळात कर्नाटकात रुढ असलेल्या यक्षगान या लोककलेचे किंवा कोकणात प्रसिध्द असलेल्या दशावतारी खेळांचे संस्कारीत रुप आहे. आधुनिक नाटकाचा विकास इंग्रजी नाटकांच्या अनुकरणातून झालेला दिसून येतो. विष्णूदास भावे यांचे संगीत स्वयंवर हे नाटक म्हणजे दशावतारी खेळाचे अखेरचे रुप होते असे म्हटले जाते. त्या अगोदर इ.स.१६८२ ते इ.स.१८३३ या कालखंडात तंजावरची नाटके आली होती.नंतर नाटकाला साम्य दर्शवणारा तमाशा प्रकार, ऑपेरा नाटक, पारशी नाटक आणि आजची रंगभूमी या परिवर्तन प्रक्रियेचा अभ्यास करता येईल.

हौशी रंगभूमी :

इ.स १६८२ ते इ.स.१८३३ च्या दरम्यान तंजावरचे राजे व्यंकोजी ते दुसरे सरफोजी यांच्या दरम्यान जी नाटके सादर झाली ती केवळ हौस म्हणून रंगमंचावर आली.त्यातीलच एक नाटक म्हणजे लक्ष्मी नारायणकल्याण होय.

या नाटकाची भारदस्त भाषा, वेधक आणि चटकदार संवाद आणि कल्पनारम्य कथानक यामुळे या नाटकाचे वाङ्मयीन स्वरुपही रसाळ झाले आहे.या नाटकांचा व्यावसायिक दृष्टीकोन नसतो.फक्त मनोरंजन करणे व नटाची हौस भागविण्यासाठी ही नाटके सादर केली जातात.अशाप्रकारे प्रायोगिक रंगभूमी, हौशी रंगभूमी यांचाही अभ्यास करणार आहे.

अभिरुची व लोकाभिरुची :-

अभिरुची म्हणजे म्हणजे आवड पौराणिक ऐतिहासिक अथवा आधुनिक कालखंडाची पार्श्वभूमी असलेल्या मराठी नाटकांमधून मानवाच्या आत्मिक आणि भौतिक जीवनाचे चित्रण केले.त्यामुळे लोकांमध्ये नाटकांविषयी अभिरुची निर्माण होऊ लागली.उदा.संगीत सौभद्र, कृष्ण आणि रुक्मिणी यांचे भावजीवन मानवी पातळीवर चित्रित केल्याने प्रेक्षकांमध्ये या नाटकाची अभिरुची निर्माण झाली उदा.

कृष्ण : (दासी) काय ग, काय चालले हे ?

कोकिला : (हात जोडून) काही नाही. बाईसाहंबांचा किंचित डोळा लागला आहे.

कृष्ण : का आज लवकर झोप लागली काल रात्री जाग्रण बिग्रण झाले होते की काय ?

कोकिला : आज किती एक दिवस सरकारचे इकडे येणे झाले नाही, यामुळे रोज जाग्रणेच चालली आहेत.

हा प्रसंग व्यक्तीच्या दैनंदिन जीवनातील आहे.त्यामुळे प्रेक्षकांमध्ये अशा नाटकांविषयी अभिरुची निर्माण होते. अशा प्रकारे लोकाभिरुची, अभिरुची , लोकाभिरुची व लोकप्रियता यांचा संबंध या घटकांचा अभ्यास या मुद्दयामध्ये करणार आहे.

संहिता मुल्य आणि प्रयोग मूल्य

संहिता मूल्यःनाटकाच्या लिखित स्वरुपाला संहिता म्हणतात.नाटकाच्या लिखित संहितेला वाङ्मय प्रकारात महत्त्व असते.नाटकाच्या सादरीकरणातून संहिता निर्माण झाली.नाटकांची संहिता म्हणजे विषय, अनुभव किंवा गोष्टीच्या टप्याटप्याने केलेला विकास होय. उदा. दशावतार

दशावतार या खेळामध्ये लिखित स्वरुप नव्हते. परंतु पौराणिक कथेचा आधार घेऊन संवाद स्वत:चे होते. दशावतरी खेळ ही धार्मिक स्वरुपाची करमणूक होती.धार्मिक कथेचा आधार घेऊन लोकांचे मनोरंजन करणे हा हेतू होता.यानंतर याला कथानकाचे रुप प्राप्त झाले.कथानकाच्या आधारे संवाद लिहायला सुरुवात झाली. उदा . हरिश्चंद्र (बा.दौ. राणे)

हरिश्चंद्र राणी तारामती व राजपुत्र रोहिदास यांना विकत घ्यायला एक डोंब येतो. तेव्हा विश्वामित्र ऋषी म्हणतात,

विश्वामित्र : अरे मुर्ख माणसा जरा दुरुन बोल. विटाळ होईल नां!

डोंब : इचिपन, काय न्याय बघा ह्यो माणूस, मी माणूस, आन माणसाचा माणसालाच इटाळ होईल. म्हणून मुळ कथानकाला धक्का न लागता नाटकाची संहिता लिहिली जाते परंतु संवाद कल्पनात्मक असतात. अशाप्रकारे संहिता मुल्ये, प्रयोगमुल्ये व यातील असणारा भेद यांचा अभ्यास करता येईल.

वर्तमानकाळात रंगभूमीवर सादर होणारी नाटके

नाटकांची सूची

१) तरूण तुर्क म्हातारे अर्क - मधुकर तोरडमल
२) एकच प्याला - रा. ग. गडकरी
३) रायगडाला जेव्हा जाग येते - वसंत कानेटकर
४) भ्रमाचा भोपळा - प्र.के. अत्रे
५) प्रेमा तुझा रंग कसा - वसंत कानेटकर
६) सही रे सही -केदार शिंदे
७) गंगुबाई नॉन मॅट्रिक -विद्याधर पाथरे
८) ऑल दि बेस्ट -महेश मांजरेकर.
९) मोरूचा मावशी - प्र.के. अत्रे.
१०) शांतता कोर्ट चालू आहे - विजय तेंडूलकर.
११) गाढवाचं लग्न - दादू इंदूरीकर.
१२) तो मी नव्हेच - प्र.के. अत्रे.
१३) तुज आहे तुझपाशी - पु. ल. देशपांडे.
१४)अंमलदार - पु.ल. देशपांडे.
१५) घाशीराम कोतवाल - विजय तेंडूलकर.
१६) सखाराम बाईंडर -विजय तेंडूलकर.

१७) गिधाडे -विजय तेंडूलकर.

१८) इच्छा माझी पुरी करा - वसंत सबनीस.

१९) राजसंन्यास - रा.ग. गडकरी.

२०) आमदार सौभाग्यवती - रा.रं. बोराडे.

२१) हास्यपंचमी - बंडा जोशी.

२२) डॉक्टर तुम्ही सुध्दा - अजित दळवी.

२३) गांधी विरूध्द गांधी -अजित दळवी.

२४) समाजस्वास्थ - अजित दळवी.

२५) वाटा पळवाटा - दत्ता भगत.

२६) वन रूम किचन - गंगाराम गव्हाणकर.

२७) काट्यांची झाली फुले.- ना. वि.ढाकुलगावकर.

२८) काळोखच्या गर्भात - भि. शि. शिंदे.

२९) नटसम्राट-वि.वा.शिरवाडकर. इत्यादि.

२००० ते २०१५ या कालखंडात सादर होणाऱ्या नाटकांमध्ये वरील नाटकांचा समावेश होतो.या कालखंडात बाळ कोल्हाटकरांचे वाहतो ही दुर्वांची जुडी हे नाटक २००० नंतर पुन्हा नव्याने रंगमंचावर आले. याचा पहिला प्रयोग १६ ऑगस्ट १९६६ रोजी झाला कच्चे पाठांतर, सामान्य दर्जाचा अभिनय यांमुळे याचा प्रयोग फसला होता परंतु पहिल्या प्रयोगातील चुका दुरुस्त करुन जेव्हा हे नाटक रंगमंचावर आले तेव्हा ते अतिशय गाजले व २००० नंतरही या नाटकाने रंगमंचावर तग धरला. त्यातील एक प्रसंग पुढीलप्रमाणे सांगता येईल.

ताई : भाऊ आठवणीसारखा आलास तू. केव्हा आलास ?

सुभाष : हा काय, आताच येतोय.

ताई : कसा आलास ?

सुभाष : एस.टी.नेच आलो

ताई : तसं नाही, पण . . . . . . .आई बाबा बरे आहेत ?

सुभाष : हे चांगले आहेत. ते काशीला निघालेत.

ताई : काशीला असं एकाएकी केव्हा जाणार आहेत?

या प्रसंगाचा अभ्यास केला तर संवाद हे नेहमीच्या बोली भाषेतील आहेत.

त्यामुळे प्रेक्षकांना हे संवाद जवळचे वाटतात.भाषाही साधी, सोपी असल्याने उच्चारल्याबरोबर समजते.त्यामुळे भाषेत बोजडपणा राहत नाही. या प्रमाणेच २००० ते २०१५ मध्ये व्यावसायिक रंगभूमीवर आलेल्या नाटकांचा अभ्यास करता येणार आहे.

प्रकरण तिसरे

व्यावसायिक रंगभूमीवर सादर होणारी नाटके

२००० ते २०१५ दरम्यान व्यावसायिक रंगभूमीवरुन सादर होणाऱ्या नाटकांचे वाङ्मयीन गुणवत्तेचे मुल्यमापन करताना पुढील घटकांचा अभ्यास करण्यात येईल.

वाङ्मयीन घटकः

नाटकाच्या वाङ्मयीन घटकात निवेदन स्वगत, व्यक्तिचित्रण, आशय, सामाजिक व राजकीय पार्श्वभूमी, संघर्षाचे स्वरुप, परिणामकारकता, भाषा व संवाद यांचा समावेश होते.नटसम्राट या नाटकाचा वाङ्मयीन घटकानुसार पुढीलप्रमाणे अभ्यास करता येईल.

स्वगत :

स्वगतातील भाषा नाट्याला अधिक पोषक भारदस्त व काव्यात्मक असते.नाटककरांनी कथानकाला गती देण्यापेक्षा पात्राचे स्वभावचित्र रेखाटण्यासाठी स्वगताचा वापर केला जातो. स्वगत म्हणजे ती ती भूमिका करणा-या नटाच्या किंवा नटीच्या अभिनयाचा कस पाहणे .उदा. नटसम्राट या नाटकातील स्वगत

अप्पा : हे स्वर्गस्थ शक्तींनो! येथेपासून स्वगताला सुरुवात होते किंवा ,

"कुणी घर देता का घर ! एका तुफानाला कुणी घर देता का घर? "

अशा प्रकारच्या स्वगतात पात्राच्या मनाची घालमेल दिसते.

व्यक्तिचित्रणे :

नटसम्राट या नाटकात मुख्य पात्र आप्पासाहेब बेलवलकर आहेत.त्यानंतर कावेरी, सुधाकर, श्री.व सौ.कळवणकर राजा इ.पात्रे दुय्यम दर्जाची आहेत.ही पात्रे मुख्य पात्राच्या भोवती फिरतात.उदा. कावेरीचे व्यक्तिचित्रण नायकाची ही साधी, भोळी, पतीच्या सुखदुःखात, जीवनात एकरुप झालेली व्यवहारी पत्नी. अप्पा तिला प्रेमाने सरकार म्हणतात.पतीचा सन्मान करताना ती म्हणते, "पुढचं वाढलेल ताट द्याव पण बसायचा पाट देऊ नये."माणसांना ही प्रेमाची सूचना ती दिसते.अशा प्रकारे सर्व व्यक्तिचित्रणाचा अभ्यास करणार आहे.

कथानक :

नटसम्राट नाटकाचा आरंभ भावनात्मक पार्श्वभूमीवर झाला आहे. एका वृध्द व्यक्तिच्या सुखाचे-दुःखाचे, मनाचे, स्वभावाचे अनेक पैलू अप्पासाहेब व कावेरीच्या रुपाने रंगमंचावर वि.वा. शिरवाडकरांनी आणले.नटसम्राट म्हणून अप्पांनी मिळविलेली सर्व संपत्ती आपल्या मुलांच्या नावे करतात.परंतु कावेरीचा याला विरोध असतो.ते म्हणतात, "मग ही पोरं काय आपल्याला रस्त्यावर टाकतील." येथे आप्पांच्या स्वप्नांचा भंग होतो.आणि वास्तवाला सुरुवात होते.म्हातारपणी येणाऱ्या हाल अपेष्टा यांचे चित्रण नटसम्राट या नाटकात आले.याचा सविस्तर अभ्यास या मुद्यात करणार आहे.

संवाद व भाषा :

नाटकातील पात्रे भाषेचा उपयोग तीन प्रकारे करीत असताना संवादातून, स्वगतातून आणि जनान्तिकम. या द्वारे भाषेचा उपयोग करुन ही पात्रे प्रेक्षकांवर छाप पाडतात. नटसम्राट मधील भाषा साधी, सोपी आहे.परंतु कल्पकता, काव्यात्मकता, रचना यामुळे भाषेला सौंदर्य प्राप्त झाले उदा.

"माझी पृथ्वी वेगळी होती.कवींच्या प्रतिभेन निर्माण केलेली, थिएटरमधील अंतराळानं तोलून धरलेली, चंद्रसूर्यान नव्हे तर रंगमंचावरील दिव्यांनी प्रकाशित केलेली."

यावरुन वि.वा.शिरवाडकरांनी कल्पकतेचा पुरेपूर वापर केलेला दिसून येतो. त्याच प्रमाणे,

"अडूगळं मडूगळं

सोन्याचं कडूगळं."

यावरुन काव्यात्म भाषेचा प्रत्यय येतो.

अशाप्रकारे सामाजिक व राजकीय पाश्वभूमी संघर्षाचे स्वरुप या घटकांचा अभ्यास करणार आहे. त्याचप्रमाणे नाटक यशस्वी होण्यासाठी लागणारे घटक निवेदन, सुत्रधार, सोंगाडया, स्वगत, नेपथ्य, संगीत प्रकाश योजना यांचाही अभ्यास करता येईल.

प्रकरण चौथे

व्यावसायिक रंगभूमीवरून सादर होणाऱ्या नाटकांचे विशेष

सादरीकरणात नटाला विशेष महत्त्व असते.नट हा नाट्य संहितेतले फक्त शब्द उच्चारत नसतो.त्या शब्दांतून प्रकट होणारे अर्थाचे सर्व बारकावे तो प्रेक्षकापर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न करीत असतो.यासाठी त्याचे मुद्राभिनया बरोबर सारे शरीरच माध्यम बनलेले असते.

नटसम्राट या नाटकात गणपतराव बेलवलकरांची भूमिका डॉ श्रीराम लागू, दत्ता भट, सतीश दुभाषी, चित्तरंजन कोल्हटकर, नाना पाटेकर या सर्वच नटांनी केली.हे सर्वच नट अत्यंत ताकदीचे परंतु सादरीकरणाच्यावेळी प्रेक्षक तुलना करतात.तरतम भावाने कोणाची भूमिका अधिक चांगली हे सांगतात.त्यामुळे सादरीकरणात नटाला अनन्यसाधारण महत्त्वाचे स्थान असते.

सादरीकरणात पात्रांच्या हालचालींना महत्त्व असते. वऱ्हाड निघालय लंडनला या नाटकात लक्षमण देशपांडे यांनी केलेल्या हावभाव व हालचालीवरुन लग्नातील वऱ्हाडाची धावपळ विमान प्रवास यासारख्या घटना प्रेक्षकांना समजून घ्याव्या लागतात.

नाटकाच्या सादरीकरणात शब्दफेकीलाही महत्त्व आहे.शब्दातील आरोह-अवरोह शब्दावरील जोर, मुक कालावधी यांना महत्त्व आहे.हे शब्दामध्ये अचूक वेळ असणे गरजेचे आहे.

अशाप्रकारे सादरीकरणाप्रमाणेच संवाद, व्यवच्छेदकता, नाटकाची यशस्वीता, द्वंद्वात्मक जाणीव, अभिव्यक्ती, परिणामकारकता, प्रेक्षकांची आवड, पात्रांची निवड या सर्व घटकांचा अभ्यास प्रस्तुत प्रकरणात करणार आहे.

प्रकरण पाचवे

उपसंहार

व्यावसायिक रंगभूमीवरील मराठी नाटकांची गुणवत्ता व लोकप्रियता (२००० ते २०१५) या कालखंडाच्या संदर्भात अभ्यास करतांना मिळालेल्या निष्कर्षाचा अभ्यास प्रस्तुत प्रकरणात मांडला जाणार आहे.

मराठी नाटक संकल्पना व स्वरुप, मराठी व्यावसायिक रंगभूमी, व्यावसायिक रंगभूमीवर सादर होणाऱ्या नाटकांचे वाङ्मयीन विशेष या सर्व प्रकरणांचा अभ्यास करताना हाती आलेले निष्कर्ष यात मांडणार आहे.

साधन ग्रंथ सूची

१) तरूण तुर्क म्हातारे अर्क - मधुकर तोरडमल

२) एकच प्याला - रा. ग. गडकरी

३) रायगडाला जेव्हा जाग येते - वसंत कानेटकर

४) भ्रमाचा भोपळा - प्र.के. अत्रे

५) प्रेमा तुझा रंग कसा - वसंत कानेटकर

६) सही रे सही -केदार शिंदे

७) गंगुबाई नॉन मॅट्रिक -विद्याधर पाथरे

८) ऑल दि बेस्ट -महेश मांजरेकर.

९) मोरूचा मावशी - प्र.के. अत्रे.

१०) शांतता कोर्ट चालू आहे - विजय तेंडूलकर.

११) गाढवाचं लग्न - दादू इंदूरीकर.

१२) तो मी नव्हेच - प्र.के. अत्रे.

१३) तुज आहे तुझपाशी - पु. ल. देशपांडे.

१४) अंमलदार - पु.ल. देशपांडे.

१५) घाशीराम कोतवाल - विजय तेंडूलकर.

१६) सखाराम बाईंडर -विजय तेंडूलकर.

१७) गिधाडे -विजय तेंडूलकर.

१८) इच्छा माझी पुरी करा - वसंत सबनीस.

१९) राजसंन्यास - रा.ग. गडकरी.

२०) आमदार सौभाग्यवती - रा.रं. बोराडे.

२१) हास्यपंचमी - बंडा जोशी.

२२) डॉक्टर तुम्ही सुध्दा - अजित दळवी.

२३) गांधी विरूध्द गांधी -अजित दळवी.

२४) समाजस्वास्थ - अजित दळवी.

२५) वाटा पळवाटा - दत्ता भगत.

२६) वन रूम किचन - गंगाराम गव्हाणकर.

२७) काट्यांची झाली फुले.- ना. वि.ढाकुलगावकर.

२८) काळोखच्या गर्भात - भि. शि. शिंदे.

२९) नटसम्राट-वि.वा.शिरवाडकर. इत्यादि.

३०) टिळक आणि आगरकर - विश्राम बेडेकर.

३१) हरि अप हरि - जयवंत दळवी.

३२) बॅरिस्टर - जयवंत दळवी.

३३) पुन्हा सही रे सही - केदार शिंदे.

३४) जादू तेरी नजर - रत्नाकर मतकरी.
३५) कार्टी प्रेमात पडली - रत्नाकर मतकरी.
३६) सावळ्या तांडेल - रत्नाकर मतकरी.
३७) वाहतो ही दुर्वांची जुडी - बाळ कोल्हटकर.
३८) लहानपण देगा देवा - बाळ कोल्हटकर.
३९) लव्हबर्डस - मधुकर तोरडमल.
४०) थँक्यू मिस्टर ग्लॅड - अनिल बर्वे.
४१) हँडस् अप - वसंत कामत.

इ.यांसारख्या नाटकांचा अभ्यास केला जाणार आहे.

संदर्भ ग्रंथ सूची

१)मराठी नाट्यसमीक्षा - रंगयात्रा - नाट्यसंपदा प्रकाशन,१९८८.

२) मराठी नाटक घटना आणि परंपरा - काळे के.ना. (संपा.) - मराठी साहित्य संघ, मुंबई,१९७१.

३) नाट्यवेध - कुलकर्णी द.भि. - नूतन प्रकाशन, पुणे,१९७८.

४) सं. सौभद्र घटना आणि स्वरूप - कुलकर्णी व. द.- व्हीनस प्रकाशन, पुणे, १९७४.

५) मराठीचा नाट्यसंसार - खांडेकर वि. स.- देशमुख आणि कंपनी, पुणे, १९७७.

६) मराठी वाङमयाचा इतिहास (खंड १,२,३,४,५) - जोग रा. श्री.(संपा.)-म.सा.प. पुणे.

७) नाट्याचार्य कृ. प्र. खाडिलकर - फाटक न.र. - मौज प्रकाशन, मुंबई,१९७३.

८) अरण्यक - रत्नाकर मतकरी - मॅजिस्टिक बुक स्टॉल, मुंबई, १९७५.

९) मराठी नाटक आणि रंगभूमी : समीक्षा - काळे के. ना. - मॅजिस्टिक बुक स्टॉल, मुंबई,१९७१.

१०) रंगविमर्श - कुरुंदकर नरहर - इंद्रायनी प्रकाशन, पुणे.

११) मराठी नाटक थिटे का? - मनोहर माधव - वसंत बुकस्टॉल, मुंबई.

१२) वाचिक अभिनय - लागू श्रीराम - राजहंस प्रकाशन, पुणे.

१३) मराठी नाट्यतंत्र - ब्रम्हे मो. द. - सुविचार प्रकाशन, पुणे,१९७३.

१४) मराठी नाटक-नाटककार - काळ आणि कर्तृत्व - देशपांडे वि. भा. - दिलीपराज प्रकाशन,पुणे,२००८.

१५) नटसम्राटः एक अभ्यास - ब्रम्हे मो. द. - व्हीनस प्रकाशन, पुणे,१९७३.

१६) नाटकः रंगाविष्कार आणि रंगास्वाद - कुलकर्णी व. दि. - पद्मगंधा प्रकाशन,पुणे,२००१.

१७) पौराणिक नाटकः नवा अन्वयार्थ - अरूण प्रभुणे - प्रतिमा प्रकाशन, पुणे, १९९७.

१८) वाङ्मय प्रकार (काव्य आणि नाटक) - भगत दत्ता - ग्रंथनिर्मिती केंद्र य.च.म.मु. विद्यापीठ, नाशिक,२००२